
ISBN-978-93-95494-00-7

# Current Trends in Humanities & Commerce

## Peer-Reviewed Book Chapter

Chief Editor : Prof. Virag.S.Gawande
Editor : Dr.Dinesh W.Nichit







ISBN-978-93-95494-00-7

# Index



| S.No | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | स्थानिक स्वशासनाचे महत्त्व प्रा.डॉ.कदम डी.एम. | 1 |
| 2 | ज्ञानरचनावाद : समाजाचा सर्वांगीण विकास प्रा.डॉ.तानाजी ज्ञानदेव पाटील | 10 |
| 3 | देशामध्ये झालेली चलनवाढ व त्याची कारणे प्रा. अनिल आर. राऊत | 14 |
| 4 | वारा वाजे रूणझुणा डॉ. रमेश बलभीम जाधवर | 18 |
| 5 | भारतीय शिक्षण प्रणाली व शाश्वत विकास : एक चिकित्सक अध्ययन डॉ. नरेद्र केशव पाटील | 29 |
| 6 | भापा,साहित्य कला आणि संस्कृती : एक विवेचन प्रा. डॉ.रवींद्र भाऊराव साखरकर | 38 |
| 7 | १८५७ की क्रांती के दौरान बुन्देली लोकगीतो से जनजागरण एक ऐतिहासिक सिंहावलोकन प्रा.डॉ. तिर्थनंद बन्नगरे | 44 |
| 8 | राष्ट्रसंतांची हिंदी भजने : सामाजिक मुल्ये डॉ. प्रवीण कारंजकर | 51 |
| 9 | औद्योगिक आजारपण : कारणे परिणाम आणि उपाय प्राध्यापक डॉ. कृष्णा शंकर शहाणे | 59 |
| 10 | महाराष्ट्रातील तरुणांसाठी भूशास्त्रातील संधीबाबत आढावा..... श्री भावेश दिनू पाटील | 68 |
| 11 | इतिहास संशोधनात पुरातत्त्वशास्त्र, तत्वे व पद्धतीचे महत्त्व जगदीश दौलतराव चिंचोळकर | 74 |

ISBN-978-93-95494-00-7


| | | |
|---|---|---|
| 12 | स्वराज्य निर्मितीचे नेतृत्व करणाऱ्या राजमाता जिजाबाई भोसले यांच्या जन्म तिथीची सत्यता **रविंद्र शंकरराव फटींग** | 79 |
| 13 | सर्वसमावेशक शिक्षण **डॉ. एकनाथ द. वाजगे** | 86 |
| 14 | साठोत्तरी दलित साहित्य प्रवाह **प्रा. सौ. सुनिता प्रदिप रंगारी** | 97 |
| 15 | योग्य शेती विपणन पद्धतीतुन भारताचा आर्थिक विकास **प्रा. डॉ. साहेबराव दौलत निकम** | 107 |
| 16 | अंगणवाडी केंद्र :— बाल्यावस्था देखभाल व विकास **डॉ. राजू के. माटे** | 133 |
| 17 | नाझीवादाचे मानसशास्त्र **कु. युगंधरा य. शिवणकर** | 140 |
| 18 | WTO and India– WTO Agreement on Indian Agriculture **Dr. Santosh Premdas Rathod** | 147 |
| 19 | Cultural Hegemony in Ben Okri's Songs of Enchantment **Dr. D. R. Khanderao** | 154 |
| 20 | A Study of Automation and Networking of College Libraries Affiliated to Mumbai University **Mrs. Deepa D. Patil** | 159 |
| 21 | Role Of Finance In Growth And Development **Narendra D. Najardhane** | 169 |
| 22 | हिन्दी साहित्य में स्त्री विमर्श **प्रा.डॉ. सुशांत सुरेंद्र ठोके** | 173 |
| 23 | शेतकरी आत्महत्या आणि राजकारण **प्रा.गांगुर्डे रामदास भीमा** | 177 |

ISBN-978-93-95494-00-7

# शेतकरी आत्महत्या आणि राजकारण

प्रा.गांगुर्डे रामदास भीमा

एम.ए,बी.एड,सेट,पेट, पी.एच.डी APP.राज्यशास्त्र.(विभाग प्रमुख) सुपे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुपे, ता. बारामती जि. पुणे.

Emil - abhiramdip@gmail.com, Mob.No-7219456215

## १.प्रस्तावना.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारताची बहुसंख्य जनता ग्रामीण भागामध्ये असून बहुतांशी कृषिप्रधान समाज आहे. जवळपास भारताच्या लोकसंख्येचा विचार करता आजही 65 टक्के जनता ग्रामीण भागात शेती व्यवसायावर आधारित जीवन वेथित करत आहेत. भारतात गेल्या साठ वर्षात विज्ञान,तंत्रज्ञान,शिक्षण,आरोग्य,अंतराळ,कृषी अशा विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत असला. तरी शेती क्षेत्राला योग्य न्याय न देता गौण समजले गेले आहे. परिणामी भारतातील दुष्काळ,नैसर्गिक आपत्ती, पूर परिस्थिती, नैसर्गिक असमतोल, वाढती लोकसंख्या आणि अन्नधान्य टंचाई इत्यादी अनेक आर्थिक समस्यांनी शेतकरी आणि शेतीवर आधारित जीवन व्यथित करणारी शेतमजूर उद्योजक आज मोठ्या अडचणीत सापडलेली आहेत. शासनाच्या व राजकीय धोरणाच्या आणि राजकारणाच्या गोंधळाने शेतकरी त्रस्त एकूणच विस्कळित असे जीवनमान आणि नैराश्यचे जीवन जगतांना दिसत आहे.म्हणून प्रस्तुत विषयात शेतकरी आत्महत्या आणि राजकारण त्याचबरोबर शासकीय धोरण आणि राजकारण्यांची उदासीनता, शेतकऱ्यांमध्ये निर्माण होणारी नैराश्य कारणे, राजकीय धोरणाचा अभ्यास करण्याची गरज आहे.

## २.अभ्यास पद्धती-

**शोधनिबंध तयार करण्यासाठी वर्णनात्मक निरीक्षण अभ्यास पद्धतीचा आधार घेतलेला आहे.**

ISBN-978-93-95494-00-7

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी विविध वर्तमानपत्र, दूरदर्शन, प्रत्यक्ष निरीक्षण अनुभूती यांचा आधार घेऊन शेतकरी आत्महत्या आणि राजकारण याविषयी मांडणी केलेली आहे.

३. प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे-

१. भारतातील शेतकरी आत्महत्या आणि राजकीय धोरणातील अनिश्चित्तापणा यांचा अभ्यास करणे.

२. शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विविध योजना, अनुदान, जागृतीचा शेती क्षेत्राला होणारा लाभ/तोटा याचा अभ्यास करणे.

३. स्थानिक सावकारी, जुनाट कर्ज, सरकारी अधिकाऱ्यांची उदासीनता, वाढती महागाई,राजकारण्यांचे पोकळ आश्वासने परिस्थितीचा शेतकऱ्यावर होणाऱ्या परिणामाचा अध्ययन करणे.

४.शोधनिबंधाची गृहितके.

१. राजकारण, बदलते राजकीय धोरण / निर्णय आणि बियाणांच्या,औषधांच्या वाढत्या किमती व शेती खर्च उत्पन्न आर्थिक समस्येचा शेतकऱ्यावर घातक परिणाम होतात.

२. उद्योग, व्यापार क्षेत्राबरोबर शेती क्षेत्रालाही योग्य स्थान व न्याय दिल्यामुळे शेतकरी सुखी-समाधानी होतात.

३.उद्धार शासकीय धोरण,राजकीय निर्णय, राजकारणामुळे शेतकऱ्यांच्या निर्माण होणाऱ्या समस्या, आत्महत्यांचाकमी होतात.

५.भारतातील प्रादेशिक नैसर्गिक असमतोल-

भारताच्या भौगोलिक नैसर्गिक रचनेचा विचार करता भारताच्या काही जिल्हे, तालुके, गाव, खेडे प्रदेशात नेहमीच दुष्काळ पर्जन्याचा असमतोल या कारणाने शेतकरी मजूर वर्गावर संकटे येतात. त्याचा फार मोठा प्रभाव आणि परिणाम सर्व शेती क्षेत्राला बसतो. अशावेळी शासनाने कायमस्वरूपी पाणी व्यवस्थापनाच्या सोयी विशेष भांडवलाचे स्रोत, शेती उपयोगी अवजारे, खते, औषधे

योग्य किमतीत योग्य विभाग, तालुका, जिल्ह्यातील शेतकऱ्यापर्यंत संधीचा लाभ देण्याची धोरण शासनाने राबवावेत ह्णजे शेतकऱ्यात शासनाबद्दल, राजकारणाबद्दल, राजकीय नेत्याविषयी आदर भाव निर्माण होऊ शकतो. त्याची नाराजी दूर होऊ शकते. त्यासाठी राज्यकर्त्यांनी /राजकारण्यांनी आपल्या विभागातील शेतकऱ्यात विश्वास निर्माण करून केवळ मतासाठी राजकारण न करता खऱ्या अर्थाने शेतकर्याच्या विविध समस्या, अडचणी लक्षात घेऊन योग्य ते निर्णय आणि धोरण शासनाच्या माध्यमातून अंमलबजावणी करणे.

**६.शेतकऱ्यांच्या आत्महत्या केवळ नैराश्य, आर्थिक कारणाने न होता अनेक विविध अडचणी मुळे होतात.**

भारतातील कृषी क्षेत्राचा एकूण शेतकरी बांधवांचा आणि शेतमजुरांचा सर्वे किंवा अभ्यास करता शेतकरी शेतमजूर केवळ आर्थिक अडचणीमुळे आत्महत्या करतात असे नव्हे. तर भारतीय अर्थतज्ञ प्रगतिशील शेतकरी राज्य यांचा आदर्श ठेवून शासनाने आपले धोरण निर्माण केले पाहिजे. भारतातील लहान मोठ्या शेतकऱ्यांना समान फायदा घेता येईल त्यासाठी गावतळे सार्वजनिक तळी धरणे बंधारे जी कायमस्वरूपी शेती व्यवसायाला पूरक ठरतील यावर गाव, तालुका, जिल्हा, विभाग राज्य मार्फत निधीचा शासनाद्वारे प्रत्यक्षात वापर करून शेतकरी सुखी समाधानाने उत्पन्न घेऊ शकेल. अशी धोरणं, राजकीय निर्णय प्रभावीपणे संपूर्ण देशामध्ये गाव पातळीपर्यंत राबवणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना जवळच बाजार पेठ, मार्केट, मालाची ने-आण करण्याची साधने, योग्य बाजार भाव निश्चित करून देण्याची धोरण योजना राजकीय पातळीवर होणे आवश्यक आहे. तातडीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकरी गोंधळ उडू शकत नाही.त्याच्या मनामध्ये आत्महत्या किंवा निराशा सारखा विचार करुं शकत नाही. तो आत्महत्या पासून परावृत्त होऊ शकतो.

ISBN-978-93-95494-00-7

**७. उद्योग, कारखाने, शिक्षण आणि संशोधन ,तंत्रज्ञान क्षेत्राप्रमाणेच शेती क्षेत्राकडे बघणे आधुनिक काळात महत्त्वाचे आहे.**

इतर क्षेत्रांमध्ये ज्याप्रमाणे सर्वांगीण विचार करून त्याचा निर्णय आणि धोरण आणि त्वरित अंमलबजावणी केली जाते. त्याचप्रमाणे भारतातील राज्यकर्त्यांनी, विधिमंडळ, संसदेमध्ये निर्णय धोरण आणि शेतकरी आराखडा शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन शासन राजकीय धोरण निर्णय प्रक्रियेमध्ये शेतकऱ्यांना प्रत्यक्षात सहभाग देऊन.इतर क्षेत्राप्रमाणे शेती क्षेत्राला पूरक असे धोरण निर्णय घेण्याची गरज आहे. शेती संशोधन, आधुनिक बियाणी, अवजारे निर्मिती करून शेतीतून अधिकाधिक उत्पन्न कसे मिळेल यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभागाला भरीव असे अनुदान देण्याची गरज आहे.त्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. शेती व्यवसायाला, शेतीपूरक व्यवसायाला आणि शेतमजुरांना योग्य तो न्याय आणि स्थान देण्याचे धोरण राजकीय पातळीवर, शासकीय पातळीवर होणे अपेक्षित आहे.तसे न झाल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्थ ,असंतोष बनत जातो हे लक्षात घेतले पाहिजे. किमान आर्थिक स्रोत निर्माण होतील यासारखी निर्णय धोरणं राजकीय पातळीवरून ,शासकीय पातळीपासून अंमलबजावणी त्वरित आणि त्या त्या परिस्थितीत होणे महत्त्वपूर्ण वाटते. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्या पासून परावृत्त होऊ शकेल.

**८.राजकीय निर्णय शेती उद्योगाला पूरक होतील यासाठी शासन राजकारणामध्ये एकसंधपणा निर्माण व्हावा.**

राष्ट्रातील जनता अन्नधान्य पाणी मूलभूत गरज आणि सुखी करण्याचे काम जसे शासन राजकीय विभाग करते. तसेच काम शेतकरीही पार पाडतो. याकडे दुर्लक्ष होता कामा नये. केवळ मातासाठीच, शेतकऱ्यांच्या मतासाठी उपयोग न करता त्यांच्या विकासासाठी देशातील राजकीय संघटना, कृषिक पक्ष शेतकरी पक्ष, कृषी प्रश्न/ समस्या सोडवण्यासाठी विधिमंडळ संसदेत बसून निर्णय धोरण चर्चा त्यावरील उपाय योजना ह्या राजकीय पातळीवरच नव्हे, तर शासनाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. शेती /कृषी लाभ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कसा दिला

जाईल यासाठी सर्व परी राजकीय आणि शासकीय स्तरावरील कार्यवाही व त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. मात्र आज केवळ मतांसाठी राजकारण, शेतकऱ्यांच्या मतावर डोळा ठेवून राजकीय धोरण राबवले जात असताना शेतकऱ्यांच्या मध्ये राजकारण, राजकारण यांच्या संदर्भात शासनाच्या संदर्भात उदासीनता आणि नैराश्याचे वातावरण सर्वत्र निर्माण झालेले आहे.

**९. शेती उद्योगासाठी विशेष बँक, कर्ज अनुदान धोरणाची निर्मिती जलद गतीने होणे आवश्यक आहे.**

भारतातील शेतकऱ्यांना खाजगी सावकार कर्ज व्याजाच्या जाचातून बाहेर काढण्यासाठी विशेष धोरणे योजना निर्णयाची अंमलबजावणी हि राजकीय तसेच शासकीय पातळीवर शेतकऱ्यांच्या गाव, खेडे, वस्ती पर्यंत पोहोचवणे आणि ती राबवण्याची गरज आहे. बँकांनी केवळ श्रीमंत ओळख असणाऱ्या बड्या शेतकऱ्यांचं एकाच वेळी अनेक लाभ न देता गरीब लहान छोट्या-छोट्या शेतकऱ्यांनाही कर्ज द्यावेत, त्यांना कोणत्याही प्रकारच्या जाचक अटी न घालता सरकारी धोरणाचा आर्थिक अनुदानाचा प्रत्यक्ष लाभ मिळेल. शेतकरी आपली प्रगती करु शकेल शेतकऱ्यांकडून टक्केवारी घेणाऱ्या अधिकारी,बँकावर कठोर कारवाई करण्याची योजना प्रभावीपणे देशामध्ये राबवली जावी. त्यामुळे सरकारचे धोरण निर्णयाचा लाभ राजकीय निर्णय धोरण यशस्वी होऊ शकतील. शेतकरी शेतमजूर नैराश्यात न येता राजकारणी शासनाला सकारात्मक दृष्टिकोनातून बघून सुखी होऊ शकेल

**८. शेतकऱ्यांच्या पिकाची फळबागांची, भात शेती, फुल शेती आणि पिकांचे होणारे नुकसान आपत्तीची प्रत्यक्षात आव्हाल डिजिटल प्रणालीद्वारे तयार करून त्यांना त्वरित मदत होणे गरजेचे आहे.**

शासनाच्या कर्मचाऱ्यांकडून निपक्षपाती कुठल्याही प्रकारच्या लाभाची अपेक्षा न करता ज्या शेतकऱ्यांची खरंच नुकसान झाली. त्याला आर्थिक लाभाची संधी मिळावी. त्यानुसार राजकीय धोरणे ठरवली जावीत राखली जावी भारतातील शेतकऱ्यांच्या विकासासाठीची योजना,उपाय मार्ग हे गांव,तालुका,जिल्हा राज्य

यातील स्थानिक शेती तज्ञ कृषी अधिकारी ग्रामसेवक, तलाठी ग्रामीण, सोसायटी बँकाकडून तसा निर्णय झाल्यास भारतीय शेतकरी-शेतमजूर सुखी बनून आत्महत्येपासून बाजूला कसा जाईल.यासाठी उपाय करणे आवश्यक आहे. म्हणून "गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे गाव वाचली तर देश वाचेल ही" म्हण खरी ठरेल आणि शेतकरी राजा सुखी समाधानी होईल. कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता आपत्ती काळामध्ये ज्या ज्या छोट्यामोठ्या शेतकऱ्यांची नुकसान झालेली आहे. त्याप्रमाणे त्याला त्वरित आर्थिक लाभ मिळावीत.यासाठी विधिमंडळ संसदेमध्ये तशा प्रकारचे धोरण निर्णय त्या परिस्थितीत घेतले जावेत.त्याची कटाक्षाने अंमलबजावणी ही केंद्रीय पातळीपासून गावपातळीपर्यंत ही शेतकऱ्यांच्या साठी राबवली जावी.शेतकऱ्यांच्यात असंतोष नैराश्य आत्महत्याचा विचार येणार नाही. इतर क्षेत्राबरोबरच कृषी क्षेत्राचाही विकास व उन्नती होईल शेतकऱ्यांनाही आर्थिक स्रोत निर्माण होतील. शेतकऱ्यांची ही मुलं- मुली चांगल्या दर्जेदार शिक्षण विज्ञान तंत्रज्ञान अवगत करतील आणि एकूणच त्यांचा विकास उन्नती होऊ शकेल.

**९. केवळ मतासाठी शेतकरी आत्महत्येचे राजकारण नको तर शेतकऱ्यांच्या उन्नती विकास आणि मदतीसाठी चे वास्तव प्रस्तुत राजकीय निर्णय आणि धोरणाची राजकारण हवे.**

केवळ सार्वत्रिक, स्थानिक,विधिमंडळ मंडळी,सोसायटी,ग्रामपंचायत,पंचायत समिती,जिल्हा परिषद यांच्या संपूर्ण निवडणुका डोळयासमोर ठेवून केवळ शेतकऱ्यांची मत मिळावीत मत पेटी बांधून राजकीय स्वार्थासाठी फायद्यासाठी कृषी किंवा शेतमजुरांच्या मताचे राजकारण न करता. खऱ्या अर्थाने राजकारण्यांनी शेतकऱ्यांच्या मताचा शेतकऱ्यांच्या मत पेटीचा त्याच्या कृषी विभागात उन्नती विकास आणि प्रगतीसाठी योगदान देण्यासाठी राजकारण केले जावे. त्याचा उपयोग शेतकऱ्यांचा विश्वास आणि त्याच्यासोबत निर्माण होणारी राज्यकर्त्यांची /राजकारण्यांची पुढाऱ्यांची नाते ही कायमस्वरूपी विचार-विनिमय सहकार्याची कशी निर्माण होतील. जेणेकरुन शेतकऱ्यांचा आत्मविश्वास कसा वाढेल. त्या दृष्टीतून

ISBN-978-93-95494-00-7

शेतकरी आपल्या नैराश्य आत्महत्येच्या विचारातून बाहेर कसा पडेल. याचा साठीचे सर्वच राजकीय पक्षांनी राजकारण्यांनी पुढाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी आपापले स्वार्थ बाजूला ठेवून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची शेतकरी राजकारण निर्माण झाल्यास शेतकऱ्यांचा राजकारण राज्यकर्त्या विषयी राजकारणाविषयी विश्वास निर्माण होऊन आत्महत्या पासून ते परावृत होतील.

**१०.शेतकरी आत्महत्या काकरतात? शेतकऱ्यांच्या मनात आत्महत्यचा विचार का आणला जातो? आत्महत्य करण्यास का मजबूर होतात? यासाठीची करणे /उपायोजना.**

येथील राजकीय नेता, राजकारणी, राजकीय पुढारी, राजकीय कार्यकर्ते राजकीय अभ्यासक आणि शासकीय अधिकारी ,नोकर, कर्मचारी आणि सामाजिक संस्था या सर्वच बाजूंनी शेतकरी आत्महत्या का करतात आत्महत्या परावृत्त का होतो? असी वेळ का निर्माण होते? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे आणि त्यावर योग्य तो उपाय शोधून काढणे आवश्यक आहे. जोपर्यंत शेतकऱ्याला त्याच्या शेती मालासाठी सुयोग्य बाजारपेठ आणि शेतीमालाचा बांधून भाव निश्चित भाव करून दिला जाऊ शकत नाही. त्याच बरोबर शेतकऱ्यांची एक अशी संघटना निर्माण होत नाही. शेतकऱ्यांच्या समस्या प्रश्न आणि आत्महत्या वर योग्य असा पर्याय उपाय योजना निश्चित केल्या जात नाहीत. त्याचबरोबर विधिमंडळ संसदेमध्ये केवळ सत्ताधारी विरोधी राजकीय पक्षांनी संसदेत बसून वादविवाद न करता कृषी, शेती शेतमजूर यांच्या आरोग्य, पाणी मूलभूत गरजा, बि- बीयाणी उत्पादनाचे स्रोत शेती, अवजारे या सर्वांचा क्रमाक्रमाने विचार विनिमय आणि धोरण केंद्रीय पातळीपासून गावपातळीपर्यंत त्याची कटाक्षाने सुयोग्य अशी शासकीय अधिकारी पदाधिकारी नोकरांच्या माध्यमातून अंमलबजावणी होऊ शकत नाही. तोपर्यंत शेतकऱ्यांच्या या प्रश्न समस्या आणि नैराश्याची राजकारण होतच राहतील. केले जाईल यात शंका नाही. म्हणून आज राज्यकर्ते राजकीय पुढारी राजकीय संघटना राजकीय पक्ष राजकीय संस्था शासकीय अधिकारी सहकारी संस्था, सामाजिक संस्था कृषी क्षेत्रावर

ISBN-978-93-95494-00-7

अभ्यास करणाऱ्या विविध अभ्यास तज्ञ आणि संशोधक यांना विचारात घेऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या विविध समस्या प्रश्न आणि त्यावर सुयोग्य पर्याय आणि उपाययोजना करणं गरजेचे आहे. जेव्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी त्यावर सुयोग्य पर्याय निवडण्यासाठी एक राष्ट्रीय पातळीपासून तर ग्रामीण पातळीपर्यंत कृषी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ शेतकऱ्याच्या मालाला सुयोग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे. शेतकऱ्याला योग्य भावात बी-बियाणे आणि खतांची वाटप होणे. कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता छोटा -मोठा शेतकरी समाधान मानून त्याला कृषी क्षेत्रात संदर्भात उपलब्ध करून दिलेली दिले जाणारे अनुदान हे त्याच्या बँक खाते खात्यावर उपलब्ध करून देणे. आपत्ती काळाच्या मध्ये त्या-त्या विभाग तालुका गाव जिल्हा राज्य अशा प्रकारचा विभागांमध्ये त्याचे विभाजन करून त्वरित नुकसानभरपाईची कार्यवाही आर्थिक लाभ त्या त्या शेतकऱ्याला त्याच्या बँक खात्यावर त्याच्या नावे उपलब्ध होणे गरजेचे आहे. कुठल्याही प्रकारचा अनुदान देताना किंवा त्यांना कोणत्याही शेतकऱ्यावर शेतमजूर कुठल्याही प्रकारचा राजकीय शासकीय पातळीवरून कोणत्याही प्रकारचा अन्याय भेदाभेद होणार नाही. याची काळजी घेणे गरजेचे आहे.

**११.शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या उच्च शिक्षण विज्ञान, तंत्रज्ञान आणि नोकरी उद्योग क्षेत्रांमध्ये प्राधान्य आणि विचार करणे आवश्यक आहे.**

केवळ शेतकऱ्यांना आर्थिक तुटपुंजे मदत किंवा सहकार्य न करता किंवा आपत्ती नुकसानीच्या परिस्थितीत सहानुभूती न दाखवता केंद्रीय पातळीपासून तर स्थानिक पातळीपर्यंत सर्व गाव ,खेडे ,जिल्हा तालुक्या खेड्यातील शेतकरी शेतमजुरांच्या मुला-मुलींच्या साठीची एक सुनिश्चित असे राजकीय शासकीय धोरण तयार करूण्याची आवश्यकता आहे.त्यांना उच्च शिक्षण तंत्रज्ञान संशोधन शिक्षणासाठी भरीव अशी धोरणाची कार्यवाही व अंमलबजावणी त्वरित करून त्यांना आर्थिक साह्य शासकीय राजकीय मदत व सहकार्य सर्वांच्याच बाजूनी त्या त्या

परिस्थितीत उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. मात्र केवळ वर्तमानपत्रे किंवा दूरदर्शन राजकीय सभा चर्चेद्वारे घोषणा न करता फोटो शेशन न करता प्रत्यक्षात या मुलांना- मुलींना शिक्षण त्यांची राहण्याची सोय शिक्षणाच्या साठीचा सहकार्य यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांची मुलं-मुली नवनवीन तंत्रज्ञान विज्ञान अवगत करून आधुनिक शेती अवजारे यासारख्या पद्धतीने शेती उद्योग करू शकतील. त्यातून शेतकऱ्यांच्या नैरश्या परावलंबन त्याचबरोबर वाढत्या आत्महत्या आणि त्या कुटुंबाची होणारी हेळसांड थांबू शकेल. यासाठी एक प्रभावी असे धोरण योजना लाभ हा कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता शेतकरी आणि शेतकऱ्याची मुलं म्हणून त्यांना मिळणे आवश्यक आहे.

**१२. आधुनिक काळात शेतकरी शेतमजुर व सध्याचे राजकारण.-**

शेतकरी,शेतमजूर विषयी राष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात शेतकऱ्याच्या संदर्भात केवळ सहानुभूती निर्माण करताना दिसतात शेतकऱ्यांच्या आत्महत्याची सत्ताधारी विरोधी, राजकीय पक्ष केवळ राजकारणासाठीच मुद्दे उपलब्ध करून आपली धोरण निर्णय संदर्भात केवळ पोकळ आश्वासने न करता मात्र ठोस असे पर्याय सहकार्य शेतकरी बांधवांना मिळत नाही. केवळ त्यांच्या नैराश्याचे त्यांच्या आत्महत्याचे राजकारण करताना भारतातील राजकीय नेते राजकीय पुढारी राज्यकर्ते आपल्याला दिसत आहेत. बऱ्याच वेळा आम्ही प्रत्यक्षात शेतकऱ्यांना अशा पद्धतीची मदत करत आहोत. म्हणून फोटोसेशन करून दूरदर्शन आणि वेगळ्या प्रसारमाध्यमांकडे पाठवून तेवढ्यापुरती त्याची दक्षता आणि नंतर राजकारण करताना दिसतात. भारतातील सत्ताधारी- विरोधी राजकीय पक्ष पंचायत समिती जिल्हा परिषद ग्रामपंचायत विधिमंडळ लोकसभा यासारख्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये केवळ शेतकऱ्यांच्या सहानुभूतीच राजकारण आपल्याला भारतामध्ये दिसत आहे. बऱ्याच योजना ह्या हवेत विरतात बऱ्याच आर्थिक अनुदानामध्ये गैर प्रकार आढळतात शेतकऱ्यांना प्रत्यक्षात या योजनेचा लाभ मिळत नाही. मिळाला तो ठराविक श्रीमंत किंवा राजकीय लागेबांधे असणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ होतो. मात्र छोट्या छोट्या

ISBN-978-93-95494-00-7

गरजू शेतकरी शेतमजुरांना त्यापासून वंचित ठेवले जाते. त्यामुळे या वंचित ठेवल्या गेलेल्या आणि भेदाभेदतून शेतकऱ्यांची हेळसांड होताना दिसत आहे. त्यातून आत्महत्या निराशा सारखे विचार शेतकऱ्यांच्या मनात येणे साहजिक आहे. म्हणून त्यावर राजकारण्यांनी केवळ आत्महत्या शेतकरी याचा समन्वय न घालता शेतकरी आत्महत्या पासून परावृत्त कसा होईल. त्याला राजकीय आणि शासकीय पातळीवर कशा प्रकारचे सहकार्य आणि मदत त्याच्यापर्यंत पोहोचू शकेल. यासाठीची राजकारण होणे अपेक्षित आहे. सरकारी कर्ज उपलब्ध करताना सरकारी बँक सहकारी सोसायटी या सर्वांनी कुठल्याही प्रकारचा भेदाभेद न करता गरजू गरीब आवश्यक असणाऱ्या छोट्या छोट्या शेतकऱ्यांना शेतमजुरांना खऱ्या अर्थाने आर्थिक सहकार्य आणि लाभ प्राप्त करून दिल्यास त्यांच्या कुटुंबाला त्यांच्या कृषी उद्योगाला सहकारी निर्माण झाल्यास त्यांची उत्पादन स्त्रोत वाढतील. एकूणच त्यांची कुटुंब सुखी बनेल ,मूलभूत गरजा पूर्ण होऊ शकतील त्यामुळे ती सुखी बनू शकतील आत्महत्याचा विचार त्यांच्या मनामध्ये येणार नाही नैराश्याचा विचार येणार नाही.

शेतकरी मालाला हमीभाव निश्चित स्वरूपाचा बाजार भाव आणि बाजारपेठ त्वरित नजीक उपलब्ध करून देणे.. शेतकऱ्याला त्याचामाल प्रत्यक्ष विकण्याची संधी आणि सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

इथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शेतकरी केवळ नैराश्यतूनच आत्महत्या करू करत नाही. तर राजकीय अक्षमता शासकीय अधिकाऱ्यांची मुजोरी आणि अक्षमता कर्जबाजारी स्थानिक सावकारी यांच्या जाचाला कंटाळून शेतकऱ्यांमध्ये आत्महत्या निर्माण होण्याची अनेक कारणे आहेत. त्यामुळे विदर्भ,मराठवाडा विभागत याच कारणामुळे सर्वाधिक शेतकर्यांनी आत्महत्या केलेल्याचे समोर आले आहे. म्हणून स्थानिक व्याज सावकार आणि जाचक व्याज पद्धती याचेही उच्चाटन करून शेतकऱ्याला त्यामधून बाहेर काढण्याचा उपाय करावीत शासकीय पातळीपासून तर राजकीय पातळीपर्यंत होणे गरजेचे आहे.

आज तरी संपूर्ण देशामध्ये शेतकरी शेतकऱ्यांची आत्महत्या आणि शेतकऱ्यांची प्रश्न समस्या यावर फार मोठ्या प्रमाणावर मतपेटी समजून भविष्यातील आपल्या राजकारणातील विजय आणि मतदार समजून राजकारणी राज्यकर्ते राजकीय नेते, शेतकरी आत्महत्याचे राजकारण करताना दिसत आहेत. हे बदलणे गरजेचे आहे. यामध्ये उद्धार दृष्टिकोन दूर दृष्टिकोन ठेवून शेतकऱ्यांच्या आत्महत्या निवारणासाठी विधिमंडळ संसदेमध्ये ठोस अशी निर्णय आणि उपायोजना राज्यकर्त्यांनी राजकीय नेत्यांनी त्या प्रकारचे निर्णय धोरण घेऊन शासकीय पातळीपर्यंत त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. तरच शेतकरी आत्महत्या नैराश्य यापासून परावृत्त होऊ शकेल अन्यथा केवळ “शेतकरी आत्महत्या आणि राजकारण”अशेच एक समीकरण पूर्वीपासून ते अद्ययावत दिसत आहे. हे भविष्यात बदलणे महत्त्वपूर्ण आहे असे मला वाटते.

**संदर्भ --**


१.शेतकरी आत्महत्या आणि राजकारण - प्रा.दिवाकर बोकरे.

२.कृषी अर्थशास्त्र आणि राजकारण -- डॉ.प्रा.कायंदे पाटील.

४.भारतीय अर्थ व्यवस्था आणि कृषी धोरण -- प्रा.डी.एस.कदम.

५.भारतीय अर्थ व्यवस्था- डॉ.प्रा.आर.के.दात्तीर

६.भारतीय अर्थ व्यवस्था - डॉ.जी.जे.लोमटे

७.२०१४ च्या निवडणुका देशाचा चेहरा मोहरा बदलणारी - प्रा.र.घ.वराडकर.

८.लोकत,सकाळ ,लोकसत्ता,सम्राट वृत्तपत्र प्रकाशित लेख.

९.रेडीओ,दूरदर्शन माध्यमांची विविध मान्यवरांची मुलाखती.